प्रेसनोट-

**58 लाखांच्या बक्षिसांसह 12 व्या राष्ट्रीय वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉनचे 8 डिसेंबर 2024 रोजी आयोजन**

विरार- ता.08-10-2024

वसई विरार शहर महानगरपालिका व वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले आहे. यंदाचे हे 12 वे वर्षे असून मॅरेथॉन स्पर्धेच्या आयोजन याकामी ॲथलेटिक फेडरेशन ऑफ इंडिया-दिल्ली , महाराष्ट्र ॲथलेटिक असोसिएशन व पालघर जिल्हा ॲथलेटिक असोशिएशन या तीनही क्रीडा संस्थांची मान्यता मिळाली आहे. मॅरेथॉन स्पर्धेचा मार्ग हा ॲम्स ( association of international marathons and distance races) या संस्थेने मोजमाप करुन प्रमाणित करुन दिला आहे. तर आर्यन्ज स्पोर्ट्स पीआर इव्हेट हे मॅरेथॉन चे इव्हेन्ट मॅनेजमेन्ट करीत आहेत.

वसई-विरार महापालिकेने अंतर्भुत केलेल्या नवीन स्पर्धा आणि इतर माहिती देणेसाठी तसेच स्पर्धेला नव्याने लाभलेल्या प्रायोजकांचे स्वागत करण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन विरार मुख्यालयात करण्यात आले होते. यावेळी मा.आयुक्त अनिलकुमार पवार (भा.प्र.से), माजी महापौर नारायण मानकर,माजी महापौर प्रविण शेट्टी, क्रीडा विभागाचे अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, मॅरेथॉन मुख्य समन्वयक श्री.पंकज ठाकूर,प्रकाश वनमाळी, संदेश जाधव, प्रशांत राऊत,डॉ.प्रविण क्षिरसागर, तसेच प्रकृती हॉस्पीटल चे प्रतिनिधी श्री.केदार तसेच पत्रकार व महापालिका अधिकारी या पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

**स्पर्धेबाबत माहिती-** मॅरेथॉन टाईम रेस मुख्य स्पर्धा या मध्ये 42 किमी,21 किमी, 10 किमी, 5 किमी अशा स्पर्धांचा समावेश आहे. तर 11 किमी ची रेस स्पर्धकांच्या सुचने नुसार या वर्षी 10 किमी अंतराची असेल. सर्व स्पर्धांचा मार्ग मागील वर्षा प्रमाणेच सारखा असेल. स्पर्धेच्या मार्गामध्ये कोणताही बदल महापालिकेने केलेला नाही.

**नोंदणी शुल्क बाबतची माहिती-** 42 किमी व 21 किमी व 10 किमी करिता (रु.850 अधिक कर) असे मिळून 1039/- रुपये नोंदणी शुल्क आहे. 5 किमी करिता (रु. 800 अधिक कर ) असे मिळून 977/- इतके आहे. तर धमाल धाव प्रती स्पर्धक- (100 अधिक कर ) असे मिळून 122/- इतके आहे.

धम्माल धाव स्पर्धेमध्ये स्थानिक नागरिकांच्या ग्रुप मध्ये 5 व त्या पेक्षा जास्त स्पर्धक असल्यास- ग्रुप करिता 500/- रुपये, 10 व त्या पेक्षा जास्त असल्यास 1000/- इतकी फी ठेवली आहे.

**नवीन वयोगट :** वृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांना धावण्याच्या माध्यमातून निरोगी राहण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या हेतुने मॅरेथॉन स्पर्धेमध्ये तीन वयोगटांची भर घातली आहे. महिलांसाठी पूर्ण मॅरेथॉनमध्ये 55 व त्यावरील वयोगट असा आहे. तर 10K आणि 5K या स्पर्धेमध्ये अनुक्रमे वय 60 व त्यावरील असा वयोगट पुरुष आणि महिलांसाठी नवीन वयोगट तयार केला आहे.

**वसई तालुक्याकरिता विशेष स्पर्धा-** वसई तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांकरिता 5 वी ते 10 वी चे विद्यार्थी असलेल्या स्पर्धा यामध्ये 5 किमी, 2 किमी, 3 किमी या स्पर्धा असून या करिता कोणतेही स्पर्धा शुल्क नाही. या स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या सर्व स्पर्धकांना पहिल्यांदाच कस्टमाईज बीब नंबर (रनिंग नंबर), स्पर्धा पूर्ण केलेल्या सर्व स्पर्धकांना डिजिटल सहभाग प्रमाणपत्र , गुडीबॅग व भरीव रोख रक्कमेची पारितोषिके दिली जातील.

सिनिअर सिटीझन 60 वर्षा वरील स्पर्धकांकरिता 1 किमी स्पर्धा व 50 वर्षा वरील स्पर्धकांसाठी 3 किमी ची स्पर्धा असणार आहे. या करिता देखील कोणतेही शुल्क महानगरपालिकेने आकारले नाही.

व्हील चेअर रन सुद्धा यावेळी असणार आहे मागील वर्षी या स्पर्धे खेळाडूंचा सहभाग पाहता यावर्षी व्हील चेअर स्पर्धे मध्ये नक्कीच वाढ दिसणार आहे.

**पालघर जिल्ह्यातील ज्युनिअर ॲथलिट व होशी धावपट्टू करिता विशेष स्पर्धागट-** पालघर जिल्ह्यातील वय वर्षे 16 ते 18 मधील ज्युनिअर ॲथलिट, होशी धावपट्टू यांचे साठी विशेष सवलती मध्ये यंदा स्पर्धेचे आयोजन केले आहे. या वयोगटात भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना 500 रुपये नोंदणी शुल्क या वेळी आकारले आहे. देशातील नामवंत खेळाडू यांचे सोबत धावण्याची संधी मिळावी, देश व विदेश पातळीवर आपले खेळाडू निर्माण व्हावे हा प्रमुख उद्देश आहे.

या प्रवेश शुल्का मधून नोंदणी केलेल्या स्पर्धकांना ब्रॅन्डेड टिशर्ट, रनिंग टाईमिंग चिप(बीब नंबर), थ्री डी मेडल, डिजिटल सहभाग प्रमाणपत्र या व्यतिरिक्त सर्व रुट वरील सुविधा देणार आहोत.या स्पर्धेची नोंदणी ऑफलाईन पद्धतीने होणार आहे. याकरिता मुख्यालयात प्रवेशिका आपण उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच रोख रक्कमेची पारितोषिके देखील दिली जाणार आहे. मुख्य म्हणजे प्रमुख रेस ला ज्या सुविधा दिल्या जातात त्याच सुविधा या वयोगटातील स्पर्धकांना दिल्या जाणार आहेत.

**बॅटल रन**- ही स्पर्धा पुन्हा सुरु करित आहोत. ही स्पर्धा ग्रुप स्पर्धा आहे. बॅटल रन एका संघामध्ये 4 स्पर्धक असतील , त्यामध्ये एक महिला स्पर्धक असणे गरजेचे आहे. एकच स्पर्धक 25 वर्षाखालील असेल व दुसरे दोन स्पर्धक 25 वयापेक्षा जास्त असतील. मॅरेथॉन स्पर्धेच्या नोंदणीला माहे सप्टेंबर पासून सुरुवात झाली आहे. VVMM.IN ही या स्पर्धेची वेबसाईट आहे.

**मॅरेथॉन स्पर्धे मध्ये एकूण समारे 58 लाखांची भरगोस बक्षीसे देण्यात येणार आहेत. यामध्ये**

- 42 किमी स्पर्धे करिता एकूण : 20,35,000/-
- 21 किमी स्पर्धे करिता एकूण : 17,50,000/-
- 10 किमी स्पर्धे करिता एकूण : 4,50,000/-
- 5 किमी स्पर्धे करिता एकूण : 2,40,000/-
- 42 किमी / 21 किमी /10 किमी (वसई तालुका स्वतंत्र गट) स्पर्धे करिता एकूण : 5,74,000/-
- बॅटल रन स्पर्धे करिता एकूण : 3,00,000/-
- धम्माल धाव एकूण बक्षिसे : 61,500/-
- शालेय गटातील एकूण बक्षिसे रक्कम : 89,500/-
- ज्येष्ठ नागरिक व व्हीलचेअर गटातील एकूण बक्षिसे रक्कम : 70,950/-
- फोटोग्राफी स्पर्धा देखील आपण भरवली असून त्यांना देखील रोख रक्कम रु.30,000/- बक्षिसे देणार आहोत. तसेच इतर अन्य बक्षिसांचा देखील या मध्ये समावेश आहे.

**प्रायोजक —**

- मेडिकल पार्टनर म्हणून प्रकृती हॉस्पीटल असणार आहेत.
- फास्टअप - एनर्जी पार्टनर
- न्यू विवा कॉलेज - वेन्यू पार्टनर
- आर्ट मिडिया- आऊटडोर मिडिआ पार्टनर

**विशेष सहकार्य-**

- पश्चिम रेल्वे व मिरा-भाईंदर वसई- विरार पोलिस आयुक्त कार्यालयाचे सहकार्य यावेळी असणार आहे.

या 12 व्या राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांनी यावेळी केले.